بِسۡمِ اللّٰہِ الرَّحۡمٰنِ الرَّحِیۡمِ نَحۡمَدُہٗ وَ نُصَلِّیۡ عَلٰی رَسُوۡلِہِ الۡکَرِیۡمِ وَعَلٰی عَبۡدِہِ الۡمَسِیۡحِ الۡمَوۡعُوۡدِ

لَآ اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ مُحَمَّدٌ رَّسُوۡلُ اللّٰہِ

دفتر مجلس انصاراللہ بھارت

Office Of The Majlis Ansarullah Bharat

Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA

Mob.9682536974, E-Mail :ansarullah@qadian.in محلہ احمدیہ قادیان ۱۴۳۵۱۶ ضلع: گورداسپور (پنجاب)


# हजरत अपेक्षित मसीह व महदी (अ.स.) यांच्या विवेकपूर्ण उपदेशांद्वारे पवित्र कुरआन ची प्रतिष्ठा, स्थान, दर्जा आणि महानता यांचे वर्णन

सारांश प्रवचन खुतबा हजरत मिर्जा मसरूर अहमद, मसीहाचे पंचम खलीफा (अल्लाह त्यांचा सहाय्यक असो) दिनांक ३ फेब्रुवारी २०२३, मशिद मुबारक, टिलफर्ड,

أَشۡهَدُ أَنۡ لَّا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحۡدَهٗ لَا شَرِيۡكَ لَهٗ وَأَشۡهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبۡدُهٗ وَرَسُوۡلُهٗ أَمَّا بَعۡدُ فَأَعُوۡذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيۡطٰنِ الرَّجِيۡمِ۔

بِسۡمِ اللّٰهِ الرَّحۡمٰنِ الرَّحِيۡمِ۔ اَلۡحَمۡدُ لِلّٰهِ رَبِّ الۡعٰلَمِيۡنَ۔ الرَّحۡمٰنِ الرَّحِيۡمِ۔ مٰلِكِ يَوۡمِ الدِّيۡنِ۔ اِيَّاكَ نَعۡبُدُ وَاِيَّاكَ نَسۡتَعِيۡنُ۔ اِهۡدِنَا الصِّرَاطَ الۡمُسۡتَقِيۡمَ۔ صِرَاطَ الَّذِيۡنَ اَنۡعَمۡتَ عَلَيۡهِمۡ ۙ غَيۡرِ الۡمَغۡضُوۡبِ عَلَيۡهِمۡ وَلَا الضَّآلِّيۡنَ۔

تشہد، تعوذ اور سورۃ الفاتحہ کی تلاوت کے بعد حضورِ انور ایدہ اللہ تعالیٰ بنصرہ العزیز نے فرمایا:

पवित्र कुरआन च्या कृपांबद्दल वर्णन करताना हजरत अपेक्षित मसीह व महदी (अ.स.) म्हणतात की, पवित्र कुरआन ची कृपा आणि वैभव सतत वावरत आहे आणि ती प्रत्येक युगात तितकेच स्पष्ट आणि महत्त्वपूर्ण आहे जितके पवित्र प्रेषित च्या काळात होती.

पुढे अपेक्षित मसीह म्हणतात की, बहुतेक मुस्लिमांनी पवित्र कुरआन पासून दृष्टीआड केले आहे, हे विधान चूकीचे नाही; परंतु तरीही पवित्र कुरआन चे आशीर्वाद आणि त्याचे परिणाम नेहमीच जिवंत आणि ताजे आहेत. म्हणून, मला या वेळेस या पुराव्यासाठी पाठवले गेले आहे, आणि अल्लाहने नेहमीच त्याच्या सेवकांना त्याच्या समर्थनासाठी पाठवले आहे, कारण त्याने वचन होते की, आम्ही हे ग्रंथ पाठवले आहे आणि आम्हीच त्याचे संरक्षण करतील.

म्हणून, या युगात, सर्वशक्तिमान अल्लाहने पवित्र कुरआन च्या प्रसारासाठी आणि संरक्षणासाठी पवित्र पैगंबरा च्या खऱ्याखुऱ्या दासाला पाठवले. त्यांना त्या गूढ ज्ञानापासून अवगत करण्यात आले जे लोकांपासून गुप्त होते. हजरत अपेक्षित मसीह(अ.स.) जगात पवित्र कुरआन ची प्रभुत्ता प्रस्थापित करण्यासाठी आले आहेत. परंतु दुर्दैवाने तथाकथित मौलवींनी त्यांच्या या दाव्याला सुरुवातीपासूनच विरोध केला आहे आणि कोणत्याही प्रकारचे तार्किक युक्तिवाद ऐकण्याची इच्छा न दाखवता, जनतेची दिशाभूल करत आहेत. पाकिस्तान मध्ये वेळोवेळी या तथाकथित मौलवी खवळत असतात आणि त्यांना स्वस्त राजकारण आणि अधिकारींचा पाठिंबा देखील प्राप्त होतो ज्यानंतर ते अहमदींवर विविध सबबी सांगून अत्याचार करत असतात. गेल्या काहीं काळापासून ते अहमदींवर ईशनिंदा आणि कुरआन विकृतीकरण करण्याचे खोटे खटले बनवण्याचा प्रयत्न करत आहेत. अल्लाह त्यांच्या दुष्ट कपटांपासून रक्षण करो आणि त्यांनी ज्यांच्यावर अत्याचार केले त्या अहमदियांच्या सुटकेचे साधन निर्माण करो.

या युगात हजरत अपेक्षित मसीह व महदी यांच्याद्वारेच पवित्र कुरआन च्या अस्सल ज्ञानाचे प्रकाश मिळते आणि आज जगात अहमदिया जमाअतच केवळ हे कार्य पूर्ण रूपाणे करत आहे.

पवित्र कुरआन चे मार्तब आणि दर्जा, याविषयी अपेक्षित मसीह (अ.स) यांनी आपल्या वक्तव्यात आणि ग्रंथात जे ज्ञानप्रकाश रेखाटले आहे ते आज मी थोडक्यात नमूद करेन.

पवित्र कुरआनच्या परिपूर्ण आणि संपूर्ण शिकवणीविषयी ते एक ठिकाणी सांगतात की, माझा धर्म असा आहे की पवित्र कुरआन, शिकवणीच्या स्वरूपात परिपूर्ण आहे आणि कोणत्याही प्रकारची सत्यता त्याच्या बाहेर नाही... पण त्याच वेळी, माझा असा विश्वास देखील आहे की पवित्र कुरआनमधून सर्व धार्मिक समस्यांचे निरसन आणि विवरण आणि त्याच्या सांकेतिक भाषाचे परमेश्वराच्या उद्देशानुसार अनुमान करणे आणि ते अचूकपणे समजावूण सांगण्याची क्षमता, हे प्रत्येक प्रयत्नशील तज्ज्ञ आणि मौलवीच्या पलीकडे आहे किंबहुना हे विशेष कार्य केवळ त्यांच्याहस्तेच पूर्ण होऊ शकते, ज्यांना संदेष्टा असल्यामुळे किंवा वली असल्यामुळे, ईशवाणीच्या सहाय्याने मदत दिली गेली असेल.

मार्गदर्शनाचा पहिला स्त्रोत कुरआन आहे, या वस्तुस्थितीबद्दल, हजरत अपेक्षित मसीह व महदी (अ.स.) म्हणतात की, माझा धर्म असा आहे की अल्लाहने तुम्हाला मार्गदर्शनासाठी तीन गोष्टी दिल्या आहेत. पहिला पवित्र कुरआन आहे, ज्यामध्ये परमेश्वराचा एकेश्वरवाद, महिमा आणि गौरव यांचा उल्लेख आहे आणि ज्यामध्ये यहूदी आणि ख्रिश्चन यांच्यातील मतभेदांचा निरसन करण्यात आला आहे. परमेश्वराच्या शिकवणी आणि कुरआनच्या मार्गदर्शनाविरुद्ध एक पाऊलही उचलू नका. मी तुम्हाला खरे सांगतो की जो कोणी कुरआनच्या सातशे आज्ञांपैकी एकाकडेही दुर्लक्ष करतो, तो स्वतःच्या हाताने मोक्षाचा दरवाजा स्वतःवर बंद करतो... अल्लाहने मला संबोधित करून सांगितले आहे की, اَلْخَيْرُ كُلُّهٗ فِي الْقُرْاٰن अर्थात सर्व प्रकारची भलाई कुरआन मध्ये आहे. आणि हेच सत्यआहे.

पुढे म्हणतात की, तुम्हाला कुरआन सारखे पुस्तक देऊन देवाने तुमच्यावर खूप कृपा केली आहे... त्यामुळे तुम्हाला दिलेल्या या आशीर्वादाचे कौतुक करा. जर कुरआन आला नसता तर संपूर्ण जग एका घाणेरड्या रक्तमांससारखं राहिला असतं. कुरआन हा असा ग्रंथ आहे ज्याच्या समक्ष सर्व सन्मार्गी रित्या निरर्थक आहेत.

पवित्र कुरआन हा खातमुल कुतूब असल्याबद्दल ते सांगतात की, पवित्र प्रेषित (स.) हे खातमुन् नबिय्यीन (पैगंबरांची मोहोर) आहेत आणि पवित्र कुरआन हा खातमुल कुतूब (ग्रंथांची मोहोर) आहे. आता कोणताही शब्द किंवा दुसरी प्रार्थना याव्यतिरिक्त असू शकत नाही. पवित्र प्रेषित (स.) यांची कृती किंवा उक्ती पासून दृष्टीआड करून मोक्ष मिळू शकत नाही. जो त्या मार्गास सोडेल तो नरकात जाईल. हा आमचा धर्म आणि श्रद्धा आहे. पण त्यासोबत हेही लक्षात ठेवायला हवे की, संबोधन आणि संभाषणाचे दरवाजे या समुदायासाठी खुले आहेत आणि हा दरवाजा पवित्र कुरआन आणि पैगंबर (स.) यांच्या सत्यतेचा ताजा साक्षीदार आहे.

पुढे ते म्हणाले: इस्लामचा एक उद्देश असा होता की एखाद्या व्यक्तीने केवळ एकेश्वरवादाचे तोंडी स्वीकार करू नये तर वास्तविकपणे त्याला समजून घ्यावे आणि स्वर्ग आणि नरकावर काल्पनिक विश्वास ठेवू नये, परंतु वास्तविक जीवनात त्याला त्याबद्दल माहिती असायला पाहिजे जेणेकरून तो दुष्टी आणि रानटी जीवनापासून अलिप्त राहील. हे इस्लामचे उदात्त ध्येय होते आणि आहे आणि ते इतके शुद्ध ध्येय आहे की इतर कोणतेही राष्ट्र आपल्या धर्मात त्याचे उदाहरण सादर करू शकत नाही.

हुजूर अनवर म्हणाले की, आज अपेक्षित मसीह (अ.स.) यांच्यावर विश्वास ठेवणाऱ्यांना हा दर्जा गाठण्याची गरज आहे, हे जगाला सांगण्याची गरज आहे, जे आपल्यावर अविश्वासाचे फतवे लादतात त्यांना हे दाखवून देण्याची गरज आहे की अहमदी मिथ्य कथनावर विश्वास बाळगत नाही तर उलट एक जिवंत पुस्तक आणि जिवंत पैगंबराला स्वीकारून त्याद्वारे परमेश्वराच्या कृपांना अवतरीत होण्याची श्रद्धा बाळगतात. आणि ही श्रद्धा देखील बाळगतात की परमेश्वर आजही संभाषण करतो.

पुढे ते म्हणतात की, अल्लाहने आम्हाला असा पैगंबर दिला आहे, जो खातमुल मोमीनीन, खातमुल आरफीन आणि खातमुन् नबिय्यीन आहे. आणि त्याच प्रकारे, तो ग्रंथ त्यांच्यावर प्रकट झाले जे खातमुल कुतूब अर्थात सर्वश्रेष्ठ ग्रंथ आहे.

पवित्र कुरआनावर श्रद्धा ठेवणे किती महत्त्वपूर्ण आहे याबद्दल हजरत अपेक्षित मसीह सांगतात की, ‘‘मी पवित्र कुरआन आणि पवित्र प्रेषित (स.) यांच्या आदेशांपासून क्वचित भागही त्याग करणे गुन्हा आणि श्रद्धाहीन जाणतो. माझा असा विश्वास आहे की जो त्यापैकी एकही अंश सोडतो तो नरकवासी आहे.

पवित्र कुरआन आणि निसर्ग नियम यांच्यातील सुसंवादाचे वर्णन करताना अपेक्षित मसीह व महदी म्हणतात: शुद्ध आणि परिपूर्ण शिकवण पवित्र कुरआनची आहे, जी मानवी झाडाच्या प्रत्येक फांदीचे पालनपोषण करते. पवित्र कुरआन केवळ एका पैलूवर जोर देत नाही, तर काहीवेळा ते क्षमा आणि दया शिकवते, परंतु क्षमा करणे हितकारक आहे या अटीसह, आणि काहीवेळा ते अपराध्याला योग्य ठिकाणी आणि वेळेत शिक्षा करण्यास सांगते. वास्तविक पाहता पवित्र कुरआन परमेश्वराच्या निसर्ग नियमांचे एक छायाचित्र आहे जो नेहमी आपल्या डोळ्यांसमोर असते.

ते म्हणाले: खरा धर्म तो आहे जो या युगातही परमेश्वराचे ऐकणे आणि बोलणे या दोन्ही गोष्टी सिद्ध करतो. म्हणून, खऱ्या धर्मात, सर्वशक्तिमान ईश्वर त्याच्या संवाद आणि संभाषणाद्वारे त्याच्या अस्तित्वाची माहिती देतो. परमेश्वराला ओळखणे हे फार कठीण काम आहे आणि ईश्वर शोधणे हे ऐहिक ऋषी आणि तत्त्वज्ञांचे काम नाही. कारण पृथ्वी आणि आकाश बघून हेच सिद्ध होते की या शक्तिशाली आणि वाकबगार रचनेचा कोणीतरी निर्माता असलाच पाहिजे. परंतु तो निर्माता प्रत्यक्षात अस्तित्वात आहे हे सिद्ध होत नाही आणि 'असायला पाहिजे' आणि 'आहे' यात फरक आहे, हे स्पष्ट आहे. म्हणून, या अस्तित्वाची पक्की खबर देणारा पवित्र कुरआन आहे.

ते पुढे सांगतात की, आम्ही प्रत्येक राष्ट्राच्या आणि प्रत्येक धर्माच्या नेत्यांना आमंत्रित केले की ते आमच्या समक्ष येऊन आम्हाला त्यांच्या धार्मिकतेचे चिन्ह दाखवावे. पण एकही असा आढळला नाही जो व्यवहारिक रित्या एकसुद्धा उदाहरण प्रस्तूत करू शकतो. आमचा असा विश्वास आहे की सर्वशक्तिमान अल्लाहचे वचन एक परिपूर्ण चमत्कार आहे आणि आम्ही विश्वास ठेवतो आणि दावा करतो की इतर कोणतेही पुस्तक त्याच्याशी तुलना करू शकत नाही.

हुजूर अनवर नी हजरत अपेक्षित मसीह व महदी यांच्या वचनांद्वारे पवित्र कुरआनची शिकवण तोराह आणि गॉस्पेलच्या विरुद्ध परिपूर्ण आणि तार्किक आहे हे प्रस्तूत केल्यानंतर म्हणाले की, धाडस आणि युक्तिवादाने सर्व धर्मांवर पवित्र कुरआन चे श्रेष्ठत्व तेव्हा जाहीर करण्यात आले जेव्हा या देशावर इंग्रजांचे राज्य होते आणि मिशनरी संस्थेचा जोर होता; तरीही त्यांनी पवित्र कुरआनच्या सर्वोच्चतेला उघडपणे आव्हान दिले आणि कोणतीही भीती जवळ येऊ दिली नाही. कारण ते अल्लाहचे दूत होते, ज्यांना अल्लाहने पवित्र पैगंबरांच्या गुलामगिरीत पाठवले होते. हेच आम्हला

त्यांच्या लेखणात आणि साहित्यात पहावयास मिळते आणि हीच शिकवण अहमदिया जमाअत पसरवत आहे. आणि विरोधी आरोप लावतात की अहमदिया जमाअत पवित्र कुरआन मध्ये बदल करत आहेत.

पवित्र कुरआनचे महत्त्व आणि आवश्यकतेबद्दल हजरत अपेक्षित मसीह व महदी म्हणतात: पवित्र कुरआनचा मुख्य उद्देश संपूर्ण जगाचे प्रबोधन आहे आणि त्याचे संदेश कोणत्याही विशिष्ट राष्ट्र धर्म किंवा समुदायासाठी नसून तो संपूर्ण मानवजातीसाठी आहे.

प्रवचनाच्या शेवटी, हुजूर अनवर म्हणाले की, पवित्र कुरआन चे गुण, स्थान, दर्जा आणि उत्कृष्टतेशी संबंधित इतर अनेक परिच्छेद आहेत, जे भविष्यात स्पष्ट केले जातील.

اَلْحَمْدُ لِلّٰہِ! اَلْحَمْدُ لِلّٰہِ نَحْمَدُہٗ وَنَسْتَعِیْنُہٗ وَنَسْتَغْفِرُہٗ وَنُؤْمِنُ بِہٖ وَنَتَوَکَّلُ عَلَیْہِ وَنَعُوْذُ بِاللّٰہِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَیِّئَاتِ
اَعْمَالِنَا مَنْ یَّھْدِہِ اللّٰہُ فَلَا مُضِلَّ لَہٗ وَمَنْ یُّضْلِلْہُ فَلَا ھَادِیَ لَہٗ وَنَشْھَدُ اَنْ لَّآ اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ وَنَشْھَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُہٗ وَرَسُوْلُہٗ،
عِبَادَ اللّٰہِ رَحِمَکُمُ اللّٰہُ اِنَّ اللّٰہَ یَاْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِیْتَآءِ ذِی الْقُرْبٰی وَیَنْھٰی عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْکَرِ وَالْبَغْیِ یَعِظُکُمْ
لَعَلَّکُمْ تَذَکَّرُوْنَ اُذْکُرُوا اللّٰہَ یَذْکُرْکُمْ وَادْعُوْہُ یَسْتَجِبْ لَکُمْ وَلَذِکْرُ اللّٰہِ اَکْبَرُ۔